पहा :–सहाय्यक अधिक्षक, लेखा व वित्त विभाग जिल्हा न्यायालय, बीड यांची दिनांक 25/01/2024 रोजीची टिपणी व त्यावरील आदेश दिनांक 30/01/2024

# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, बीड

## (लेखा व वित्त विभाग)

## जाहीर–निवीदा

जावक कंमाक : 2510 /2024

दिनांक :–04/03/2024

उपरोक्त विषयी आपणांस मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश बीड यांच्या आदेशावरुन कळविण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड करिता लेजर प्रिंटर टोनर रिफिलिंग/दुरुस्ती करिता एक वर्ष करार पदधतीने मोहोरबंद अनुभवी, नामांकिंत,, नोंदणीकृत विक्रेत्याकडुन निवीदा मागविण्यात येत आहे. सदर दरपत्रके विक्रेते पुरवठादारांनी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड, जिल्हा न्यायालय, बीड या पत्याचे बंद पाकीटावर "**लेजर प्रिंटर टोनरचे रिफिलिंगचे दरपत्रक**" असा उल्लेख करुन **मा. प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांचेकडे दिनांक 12/03/2024 चे कार्यालयीन वेळेत सायंकाळी 5:30** वाजेपर्यंत सादर करावी, त्यांनतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

**जिल्हा न्यायालयातील लेजर प्रिंटरचे वर्णन**

1. Ecosys M2040 DN Kyocera Printer Toner
2 ब्रदर एचएलएल 2321 डी 2351 प्रिटर्स टोनर
3. कॅनॉन प्रिंटर्स 78 ए व 337
4 एच. पी. लेजर जेट 1008 चे टोनर व 88 ए
5. एच पी लेजर जेट 1022 चे टोनर 12 ए
6. रिको प्रिंटर टोनर व चिप
7. कॅनॉन एल बी पी 161 डी एन चे टोनर
8. कॅनॉन एल. बी. पी. 244 डी एन चे टोनर

**अटी व शर्ती**

1. लेजर प्रिंटरचे दरपत्रक स्वीकृत केल्यानंतर लेजर प्रिंटरच्या मॉडेल नुसार आवश्यक असलेल्या सुटया भागांची उदा ड्रम, ब्लेड, व्हायपर ब्लेड मॅग्नेटीक रोलर, क्लीनिंग ब्लेड, पी सी आर विविध प्रकारचे गिअर्स इत्यादी सर्व करांसह दरपत्रक सोबत सादर करावी.

2. टोनर रिफिलिंगसाठी दिल्यानंतर सदर टोनर मधील काहि पार्ट बदलावयाचे झाल्यास संगणक विभाग जिल्हा न्यायालय बीड यांना तसे सुचित करणे आवश्यक आहे.

3. टोनर रिफिलिंग करिता वापरण्यात येणारी शाई हि नामांकित कंपनीची व उच्च दर्जाची असणे गरजेचे आहे. तसे नसल्यास सदरचे टोनर पुनश्च रिफीलींग करुन दयावे लागेल व त्याचे कुठलेही अतिरिक्त देयक अदा केले जाणार नाही.

4. टोनर रिफिलींग झाल्यानंतर संगणक विभाग प्रमुखाचा समाधानकारक असल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतरच सदर टोनर रिफीलंगचे देयक सहा. अधिक्षक लेखा व वित्त विभाग यांचे मार्फत पारीत केले जाईल.

5. टोनर रिफीलींग आवश्यकतेनुसार तात्काळ किंवा एक दिवसाच्या मुदतीत व्यवस्थीतरित्या करुन दयावी लागेल.

6. सदरील टोनर हे हस्तगत करणे व पुन्हा आणुन देण्याची जबाबदारी विक्रेत्यावर राहिल.

7. देयकाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर विक्रेत्यास सीएसटी–जीएसटी पावती देणे बंधनकारक राहिल.

8. संबंधीत विक्रेत्याला सुचित करण्यांत येते की, दिलेल्या मुदतीत म्हणजेच ज्या दिनांकास आपला करार संपत असेल त्या दिनांकाच्या एक महिना आधी या कार्यालयाच्या संगणक विभागास लेखी स्वरुपात कळविणे आवश्यक आहे. जर आपण मुदतीनंतर देखील टोनर रिफिलींग/रिपेअरींग करणे चालू ठेवले तर आपले देयक हे कार्यालय पारीत करणार नाही याची विक्रेत्याने नोद घ्यावी.

9. सदर दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांचेकडुन राखुन ठेवण्यांत आला आहे. तसेच सदर पुरवठादार विकत्याचे काम समाधानकारक नसल्याची तकार संगणक विभागा मार्फत प्राप्त झाल्यास सदर दर करार कुठल्याही वेळी व कुठलीही पुर्व सुचना न देता रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांचेकडुन राखून ठेवण्यांत येत आहे.

आदेशावरुन

04.03.2024

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड